# आर्थिक समस्या

# आणि

# इस्लामी उपाय

लेखक

**सय्यद अबुल आला मौदूदी**

अनुवाद

**जावेद तडवी**

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

वर्तमानकाळात विभिन्न देशांच्या आणि राष्ट्रांच्या तसेच सामूहिक रूपाने वैश्विक आर्थिक समस्यांना जे महत्त्व दिले जात आहे, कदाचित अगोदर या समस्यांना कमीतकमी स्पष्ट रूपाने कधी महत्त्व दिले गेले नाही. 'स्पष्ट रूपाने' या शब्दाचा मी यासाठी उपयोग करीत आहे की वास्तवात मानवी जीवनामध्ये त्याची जीविका महत्त्व ठेवते. त्या दृष्टीने प्रत्येक युगात मनुष्यांच्या, समूहांच्या देश आणि राष्ट्रांच्या सर्व मानवांनी काही प्रमाणात याकडे लक्ष दिले आहे. परंतु आज यास ज्या गोष्टीने स्पष्ट रूप दिले आहे ती अर्थशास्त्राच्या नावाने सुव्यवस्थित मोठमोठी पुस्तके, भारी भरकम परिभाषांच्या आणि आलिशान (शानदार) संस्थाचे अस्तित्व असणे, तसेच जीवनसामग्रीचे उत्पादन आणि उपार्जनाच्या पध्दतींचे अधिकाधिक कठीण होत जाणे आहे. या कारणांमुळे आज आर्थिक समस्यांवर चर्चा आणि वार्तालाप आणि वैज्ञानिक शोधांचा इतका गोंगाट आहे की यांच्यामुळे मानवी जीवनाच्या सर्व समस्या दबून गेल्या आहेत. परंतु ही अजब गोष्ट आहे की ज्या गोष्टीवर जगभरात याप्रकारे (लक्ष) केंद्रित झाले आहे ती समजण्या (सुटण्या) आणि स्पष्ट (स्वच्छ) होण्याऐवजी अधिक कोडे बनत चालली आहे. अर्थशास्त्राच्या जटील परिभाषांनी आणि अर्थशास्त्रज्ञांनी केसाची कातडी काढण्यासारख्या वैज्ञानिक कृतीने सामान्य लोकांना इतके भयभीत करून टाकले आहे की ते बिचारे या उच्च श्रेणीच्या वार्तालापांना ऐकून या प्रकारे आर्थिक समस्येच्या विक्राळतेपासून आतंकित होऊन आणि तिच्या उपायांच्या सर्व शक्यतांबाबत निराश होऊन जातात. ज्या प्रकारे एक रोगी एखाद्या डॉक्टरच्या तोंडाने आपल्या आजाराचे एखादे मोठेसे लॅटिन नाव ऐकून घाबरून जातो. तो विचार करतो की जेव्हा मला इतका मोठा आजार झाला आहे तर माझ्या जीवाचा आता ईश्वरच रक्षक आहे. परंतु जर या परिभाषांचा आणि शास्त्रीय परिचर्चांचा पडदा हटवून सोप्या व स्वाभाविक पध्दतीने पाहिले गेले तर मनुष्याची आर्थिक समस्या अतिशय सहजतेने समजू शकते. या समस्येच्या सुटण्याचे विभिन्न उपाय जे जगात वापरले गेले आहेत त्याच्या लाभकारी आणि हानीकारक बाजू कोणत्याही कठीणतेविना पाहू शकल्या जाऊ शकतात आणि त्याच्या समाधानाचा योग्य आणि स्वाभाविक परिणाम जो काही होऊ शकतो, त्याच्या समजण्यात कोणतीही अडचण शिल्लक राहत नाही.

बहुभाषांचे चक्र आणि शास्त्रीय जटिलतांच्या मायाजाळाने या समस्येला पुरते गुंतविले आहे. त्यावर अधिक समस्या या कारणाने निर्माण झाली आहे की मानवाच्या आर्थिक समस्या ज्या खरेतर मानवी जीवनाच्या महत्त्वपूर्ण समस्यांचा एक भाग होता, सर्वापेक्षा वेगळे करून टाकले. एक स्वतंत्र आणि स्थायी समस्येच्या रूपाने त्याकडे पाहिले जाऊ लागले. आणि हळूहळू ही लय इतकी वाढली की आर्थिक समस्येला संपूर्ण जीवनाची समस्या समजून घेतले गेले. ही पहिल्या चुकीपेक्षाही मोठी चूक आहे, जिच्या कारणास्तव

जटिलतेला सोडविणे असंभव झाले आहे. याचे उदाहरण पूर्णपणे तसेच आहे जसे कोणी हृदयाच्या आजाराला मानवी शरीराच्या संपूर्ण व्यवस्थेपासून वेगळे करून आणि या व्यवस्थेत हृदयाचे जे स्थान आहे, त्याला दृष्टीआड करून हृदयाला फक्त हृदयाच्याच स्थानाने पाहण्यास सुरवात करून टाकातो. आणि त्याला पाहण्यात इतका बुडून जातो की शेवटी त्याला पूर्ण मानवी शरीर फक्त एक हृदयच दिसायला लागते. आपण स्वत: समजू शकता की जर मानवस्वास्थ्याच्या सर्व समस्यांना हृदयानेच सोडविण्याचा प्रयत्न केला गेला तर या समस्यांचा उपाय किती असंभव होऊन जाईल आणि मनुष्य बिचाऱ्यांचा जीव किती धोक्यात पडून जाईल. बस यावरच विचार करून आपण समजू शकता की जेव्हा आर्थिक समस्येला मानवाच्या संपूर्ण समस्यांमधून काढून वेगळे केले गेले आणि यालाच सुनिश्चित मानवता निर्धारित करून जीवनाच्या सर्व समस्या यानेच सोडवल्या जाऊ लागल्या तर निराशेशिवाय आणखी काय प्राप्त होईल?

आधुनिक युगाच्या उपद्रवांमधून या विशेषज्ञांचे उपद्रवसुध्दा एक मोठे उपद्रव आहे. जीवन आणि त्याच्या समस्यांवर सामूहिक दृष्टी कमीतकमी होत जाते. मानव विभिन्न शास्त्रांच्या एकपक्षीय विशेषज्ञांच्या हातातील खेळणे बनून राहिला आ॰. कोणी भौतिक विज्ञानाचा विशेषज्ञ आहे. तो सर्व सृष्टीचे कोडे फक्त भौतिकशास्त्राच्या आपल्या विशेषज्ञतेच्या बळावरच सोडवू लागतो. कोणाच्या बुद्धीवर मनोविज्ञान आच्छादलेले आहे. तर तो आपल्या मनोवैज्ञानिक अनुभवांवर आणि निरीक्षणांवर विश्वास पूर्ण जीवनदर्शन निर्धारित करु इच्छितो. कोण्या व्यक्तीची नजर अश्लील विषयांवर जमून राहिली आहे तर तो म्हणतो की पूर्ण जीवन फक्त कामेच्छेच्या धुरीवर घुमत आहे. याच प्रकारे जे लोक आर्थिक समस्यांमध्ये बुडालेले आहेत ते लोकांना विश्वास देऊ इच्छितात की आर्थिक समस्याच तुमच्या जीवनाची मूलभूत समस्या आहे आणि बाकी सर्व समस्या याच्या मूळ शाखा आहेत. म्हणजे वस्तुस्थिती ही आहे की हे सर्व एका कुळाचे विभिन्न भाग आहेत. या कुळात या सर्वांचे एक विशिष्ट स्थान आहे आणि स्थानाच्या अनुसारच त्यांचे महत्त्वसुद्धा आहे. मानव एक शरीर राखतो जे भौतिक कायद्यानुसार आहे. या दृष्टीने मनुष्य भौतिक विज्ञानाचासुद्धा विषय आहे. परंतु तो केवळ शरीरच नाही की फक्त भौतिक विज्ञानानेच त्याच्या समस्या सोडविल्या जाऊ शकतील. मनुष्य एक जिवंत अस्तित्व आहे, ज्यावर सजीवांसंबंधी कायदे लागू होतात. या दृष्टीने तो जीवशास्त्राचा विषय आहे. परंतु तो केवळ जीवधारी नाही की फक्त जीवशास्त्रानेच त्याच्या जीवनाचा पूर्ण (कायदा) उद्धित केला जाईल. मनुष्यास जिवंत राहण्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची आवश्यकता असते. या दृष्टीने त्याच्या जीवनाचा एक महत्त्वपूर्ण विभाग अर्थशास्त्राच्या परिघित येतो. परंतु तो केवळ खाणारा, घालणारा आणि घर बनवून राहणार प्राणी नाही की केवळ अर्थशास्त्रावरच जीवनदर्शनाचा पाया ठेवून दिला जावा. मानव आपल्या जातीला बाकी

ठेवण्यासाठी प्रजननावरही विवश आहे. त्यासाठी त्यात कामप्रवृत्तीची जबरदस्त रूची आढळली जाते. यानुसार लैंगिकशास्त्रसुद्धा त्याच्या जीवनाच्या एका प्रमुख भागाशी संबंध ठेवते. परंतु तो केवळ संतान वाढविण्याचेच यंत्र नाही की फक्त लैंगिकशास्त्राचा चष्मा लावून त्याला पाहिले जावे.

मनुष्य एक मानसिक अस्तित्वही ठेवतो, ज्यामध्ये ज्ञान आणि विवेकाच्या विभिन्न क्षमता, भावना आणि इच्छांच्या विभिन्न शक्ती आहेत. या दृष्टीने त्याच्या अस्तिवाचा एक मोठा भाग मनोविज्ञानांतर्गत येतो. परंतु त्याचे अस्तित्व सर्वथा मानसिक नाही की मनोविज्ञानांतर्गत त्याच्या जीवनाची पूर्ण योजना बनविली जाईल. मानव एक सामाजिक प्राणी आहे जो स्वाभाविक रूपाने इतर दुसऱ्या लोकांसोबत मिळून राहण्यासाठी विवश आहे. या दृष्टीने त्याच्या जीवनाचे अनेक भाग समाजशास्त्रानुसार येतात, परंतु सामाजिक प्राणी असणेही त्याचे पूर्ण अस्तित्व नाही की केवळ समाजशास्त्राचे विशेषज्ञ बनून त्यासाठी पूर्ण जीवनव्यवस्था तयार करू शकेल. मनुष्य एक बुद्धिजीवी प्राणी आहे, ज्यामध्ये दृष्टिगोचर वस्तूंच्या पुढे बुद्धिगत वस्तूंची तडपसुद्धा आढळली जाते आणि बौध्दिक संतुष्टी इच्छिली जाते. यास्तव तर्क व बौद्धिकशास्त्र त्याची ही खास मागणी पूर्ण करतात. परंतु मानव पूर्णच्या पूर्ण बुद्धी नाही की केवळ तर्क आणि बौद्धिकशास्त्राच्या बळावर त्यासाठी जीवनप्रणाली निर्धारित केली जाऊ शकेल. मनुष्य एक नैतिक आणि आध्यात्मिक प्राणी आहे. ज्यामध्ये चांगले-वाईट यांची ओळख आणि बौद्धिक व दुष्टिगोचर दोन्ही प्रकारच्या वस्तूंनी पुढच्या वास्तविकतेपर्यंत पोहचण्याची प्रेरणासुद्धा आढळली जाते. या दृष्टीने नीतीशास्त्र आणि अध्यात्मशास्त्र याच्या एक आणि महत्त्वपूर्ण मागणीला पूर्ण करतात. पण तो सर्वथा नैतिकता आणि आत्माही नाही की केवळ नीतीशास्त्र आणि अध्यात्मशास्त्राद्वारा त्यासाठी पूर्ण जीवनप्रणाली निर्धारित केली जाऊ शकेल. वास्तविकपणे मात्र एकाच वेळेस हे सर्वकाही आहे. आणि या सर्व स्थानांऐवजी त्याचे एक पद हेही आहे की तो आपले संपूर्ण अस्तित्व आणि आपल्या जीवनाच्या सर्व विभांगासमेत ब्रह्मांडाच्या या विशालतम व्यवस्थेचा एक अंश आहे. त्याच्या जीवनाचा नियम अनिवार्य रुपाने या गोष्टीला निश्चित करु इच्छितो की या जगात त्याचे स्थान (पद) काय आहे आणि त्याच्या पदाने त्याला कोणत्या प्रकारे काम केले पाहिजे? मग हेसुद्धा अनिवार्य आहे की त्याने आपल्या जीवनउद्देशाला निश्चित करावे आणि त्यानुसार निर्णय करावा की त्याला कशासाठी काम करायचे आहे? हे शेवटचे दोन्ही प्रश्न मानवी जीवनाचे मूलभूत प्रश्न आहेत. यांच्यावरच एका जीवनदर्शनाचा आविर्भाव होत असतो. मग या जीवनदर्शनांच्या अंतर्गत संसार आणि मानवाशी संबंध ठेवणारे सर्व ज्ञान-विज्ञान आपापल्या क्षेत्राशी संबंधित माहिती गोळा करतात. तथा कमीतकमी या सर्वांशी मिळून एक अशी प्रणाली बनते जिच्या अनुसार मानवजीवनाचा पूर्ण कारखाना चालत असतो.

आता ही गोष्ट स्पष्ट आहे की जर तुम्ही आपल्या जीवनाच्या समस्येला सोडवू इच्छिता तर यासाठीही काही चांगली पध्दत की तुम्ही दूर्बिन लावून केवळ एकाच समस्येला पाहावे अथवा त्याच जीवन विभागासाठी ज्याच्याशी त्या समस्येचा संबंध आहे एक प्रकारे पक्षपाती होऊन संपूर्ण जीवनावर दृष्टी टाकावी अथवा खऱ्या विवेक आणि माहितीसाठी सर्वांमध्ये ठेवून त्याला पाहावे लागेल आणि निष्पक्ष दृष्टीने पाहावे लागेल. याच प्रकारे जर तुम्ही जीवनाच्या कोणत्या भागात बिघाड पाहिला आणि त्याला दूर करू इच्छिता तर हे आणखी अधिक धोकादायक आहे की तुम्ही कोणत्या एखाद्या समस्येला जीवनाची एकूण समस्या ठरवून सपूर्ण कारखान्याला याच एका भागाच्या अवतीभवती फिरवावे. असे करून तुम्ही आणखीन अधिक असंतुलन निर्माण कराल. सुधाराची चांगली पध्दत ही आहे की पूर्ण जीवनव्यवस्थेला तिच्या मूलभूत दर्शनापासून ते पसरलेल्या शाखांपर्यंत निष्पक्ष दृष्टिकोनाने पाहा की बिघाड कोणत्या ठिकाणी आणि कोणत्या प्रकारचा आहे?

मानवाच्या आर्थिक समस्येला समजण्यायोग्य स्तरावर सोडविण्यास ज्या अडचणी समोर येत आहेत, त्याचे मोठे कारण हेच आहे की या समस्येला काही लोक अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनानेच पाहतात. तर काही हिच्या महत्त्वाला दुप्पट-तिप्पट करून हिला जीवनाची संपूर्ण समस्या ठरवून टाकत आहेत. याऐवजी काही लोक यापेक्षाही पुढे जाऊन जीवनाचे मूलभूत दर्शन, नैतिकता, नागरिकता आणि समाजाच्या सर्व व्यवस्थेची स्थापना आर्थिक आधारवरच करु इच्छितात. परंतु जर आर्थिक वस्तूंनाच आधार मानले गेले तर मानवजीवनाचा उद्देश त्या बैलाच्या जीवनउद्देशापासून काहीही वेगळा राहात नाही, ज्याच्या सर्व प्रयत्नांचा उद्देश फक्त हिरवे-हिरवे गवत खाऊन आनंदी आणि शक्तिवान बनावे. जगात त्याचे स्थान हेच राहते की तो जगाचा, फक्त एक स्वतंत्र चरणा-चरणारा पशु आहे. याच प्रकारे नीतीशास्त्र, अध्यात्मशास्त्र, न्यायशास्त्र, समाजशास्त्र, मनोविज्ञान आणि अन्य वेगळ्या सर्व शास्त्रांच्या क्षेत्रांमध्येसुद्धा आर्थिक दृष्टिकोनाच्या आधिक्याने असंतुलनाचा खूप जास्त धोका निर्माण होऊन जातो. कारण या सर्व जीवन विभागांसाठीच्या अर्थामध्ये कोणतीही मूलभूतता याशिवाय काही नाही की नैतिक आणि अध्यात्म स्वार्थ आणि भौतिकवादाचे रुप धारण करावे जर सामाजिकतेच्या सर्व नियमांचे सर्व संयोजन सामाजिक तथ्यांऐवजी व्यापारी उद्देशांवर आधारित आहे आणि मनोविज्ञानात मनुष्याचा अभ्यास फक्त एक आर्थिक पशुच्या स्थानाशी केला जाऊ लागला तर मानवतेवर यापेक्षा मोठा कोणता अन्याय होऊ शकतो?

## आर्थिक समस्येचे मूळ रूप

आता आपण जरी पारिभाषिक आणि शास्त्रीय जटिलतांशी वेगळे होऊन एका सरळसरळ पद्धतीने पाहिले तर मानवाची आर्थिक समस्या आम्हाला ही दृष्टीस येते की, सभ्यतेच्या विकासाचा वेग कायम ठेवत कशा प्रकारे सर्वच लोकांपर्यंत जीवनाच्या आवश्यक वस्तू पोहचविण्याचा प्रबंध व्हावा आणि कशा प्रकारे समाजात प्रत्येक व्यक्तीला आपले सामर्थ्य आणि योग्यतेनुसार प्रगती करणे, आपल्या व्यक्तित्वाला विकसित करणे आणि आपल्या पूर्णतेला प्राप्त होण्यापर्यंतचा कालावधी उपलब्ध राहावा?

प्राचीन काळात मनुष्याची आर्थिक समस्या जवळजवळ तितकीच सोपी होती जितकी की जनावरांसाठी सोपी आहे. ईश्वराच्या या धरतीवर जीवनाच्या अगणित वस्तू पसरल्या आहेत. प्रत्येक प्राण्यासाठी जीविकेची जितकी गरज आहे तीसुद्धा पूरक प्रमाणात अस्तित्वात आहे. प्रत्येकजण आपली जीविका शोधण्यासाठी निघतो आणि तिला जीविकेच्या खजिन्यांमधून प्राप्त करुन घेतो. कुणाला न याची किंमत चुकवावी लागते आणि न त्याची रोजी कोणा दुसऱ्या प्राण्याच्या ताब्यात आहे. जवळजवळ ही अवस्था मानवाचीसुद्धा होती. प्राकृतिक जीविका ती जरी फळांच्या रुपात असो अथवा शिकारीच्या प्राण्याच्या रुपात, प्राप्त करुन घेतले जात होते. प्राकृतिक उत्पादनांतून अंग झाकण्याचा प्रबंध करून घेतला आणि जमिनीत जिथेही अवकाश पाहिला डोके लपवायला आणि पडून राहण्यास जागा बनवून घेतली. परंतु ईश्वराने मानवाला यासाठी निर्माण केले नव्हते की तो अधिक काळापर्यंत याच स्थितीत राहावा. त्याने मानवांमध्ये अशी प्राकृतिक प्रेरणा ठेवली होती की तो एकाकी जीवन सोडून सामूहिक जीवनाचा अंगीकार करु लागावा आणि आपल्या कारागिरीने आपल्यासाठी जीवनाच्या त्या साधनांपेक्षा चांगले निर्माण करावे जे प्रकृतीने उपलब्ध केले होते. स्त्री आणि पुरुषामध्ये सतत संबंधांची स्वाभाविक इच्छा, मानवी अपत्यांचे अधिक वेळेपर्यंत आईवडिलांच्या पालनपोषणाचे गरजवंत राहाणे, आपल्या वंशासंबंधी मानवाची खोलवर आवड आणि रक्तातील नात्यांशी प्रेम, या त्या वस्तू आहेत ज्या मानवाला सामाजिक जीवन अंगीकारण्यास विवश करण्यासाठी स्वयं प्रकृतीनेच त्याच्यात ठेवून दिल्या होत्या. अशा प्रकारे मनुष्याचे आपोआप उपजनाच्या उत्पादनावर न थाबंणे आणि शेतीवाडीने आपल्यासाठी धान्य निर्माण करणे, पानांनी शरीर झाकण्यावर न थांबता, आपल्यासाठी वस्त्र तयार करणे, गुहा आणि भट्ट्यांमध्ये राहण्यास राजी न होणे आणि आपल्यासाठी स्वतः घर बनविणे, आपल्या गरजांसाठी यंत्राचा आविष्कार करणे इ. या सर्वांची प्रेरणा प्रकृतीनेच त्याच्या आत ठेवली होती. याचासुद्धा अनिवार्य परिणाम हाच होता की हळूहळू तो सभ्य व्हावा. अंततः मनुष्य सभ्य आणि सुसंस्कृत झाला तर त्याने कोणता अपराध केला? त्याच्या प्रकृतीची हीच मागणी आणि सृष्टीची हीच इच्छा होती!

सभ्यतेच्या जन्माबरोबर काही आणखी गोष्टी अवश्यभावी होत्या त्या खालीलप्रमाणे,

१) मानवजीवनाच्या आवश्यकता वाढाव्यात आणि प्रत्येक व्यक्ती स्वयं सर्व जीवनसामुग्रींना प्राप्त करू शकणे अशक्य आहे. पण त्याच्या काही गरजा दुसऱ्यांशी आणि दुसऱ्याच्या त्याच्याशी जुडलेल्या असाव्यात.

२) जीवनसामुग्रीचा विनिमय केला जावा आणि हळूहळू वस्तूंच्या विनिमयाचे एक माध्यम निश्चित व्हावे.

३) गरजेच्या वस्तू तयार करण्याचे यंत्र आणि परिवहनांची साधने वाढविली जावीत. तसेच जितक्या नवीन गोष्टींची मानवाला माहिती व्हावी त्या सर्वांपासून फायदा घेत जावा.

४) मानवाला याचे समाधान असावे की ज्या वस्तू त्याने आपल्या कष्टाने प्राप्त केल्या आहेत, त्या यंत्र ज्याच्याने तो काम करतो, ती जमीन जिच्यावर त्याने घर बनविले आहे, ते स्थान ज्याच्यावर तो आपल्या पेशाचे काम करतो हे सर्व त्याच्याच ताब्यात राहतील आणि त्याच्यानंतर त्या लोकांना दिली जाईल जे दुसऱ्यांपेक्षा त्याचे आपले जवळचे लोक असतील.

अशा प्रकारे विभिन्न व्यवसायांचे निर्माण होणे, क्रय-विक्रय, वस्तूंच्या मूल्यांचे निर्धारण, मूल्यांच्या मापदंडाच्या स्वरूपावर रूपयांचे चलन, आंतराष्ट्रीय देवाण-घेवाण आणि आयात-निर्यातीपर्यंत बाब पोहचणे, उत्पादनाची नवीन साधने आणि यंत्राचे वापरात येणे, मिळकतीचे अधिकार आणि वारसाहक्कांचे अस्तित्वात येणे हे सर्व स्वाभाविक रुपाने झाले. तसे यातून कोणतीही वस्तू अपराध नव्हता की त्याचा त्याग करून पश्चात्ताप करण्याची आवश्यकता असेल.

मग नागरिकता आणि सभ्यतेच्या विकासासोबत हेही आवश्यक होते की,

१) विभिन्न मनुष्यांच्या शक्तींच्या आणि योग्यतेच्या आत जे अंतर प्रकृतीने ठेवले आहे, त्याच्या कारणांमुळे काही लोकांना आपल्या मूळ गरजेपेक्षा अधिक कमविण्याची संधी मिळावी, काही आपल्या गरजेपुरते आणि काहींनी त्याहीपेक्षा कमी कमवावे.

२) काही लोकांना वारसाहक्काद्वारे जीवनाची सुरूवात करायला चांगली संसाधने उपलब्ध व्हावीत. काही कमी संसाधानांसोबत आणि काहींना विनासंसाधानांच्या सहाय्याने जीवनक्षेत्रात पाय ठेवावा.

३) प्राकृतिक कारणांनी प्रत्येक लोकवस्तीत असे लोक अस्तित्वात राहावे जे अर्थाजनाच्या कामात भाग घेण्यात आणि विनिमयकार्यात सहभागी होण्यात पूर्णपणे असमर्थ असावेत. जसे मुले, वृद्ध, आजारी आणि अपंग इ.

४) काही लोक सेवा घेणारे आणि काही लोक सेवा करणारे असावेत आणि अशा प्रकारे मुक्त कला-कौशल्य, व्यापार, कृषी आणि नोकरी तसेच मजुरीची अवस्थासुद्धा निर्माण व्हावी.

हे सर्वसुद्धा स्वयं मानवी सभ्यतेचे स्वाभाविक प्रतीक आणि प्राकृतिक भाग आहेत. या बाबींची निर्मीती होणेदेखील आपल्या जागी काही गुन्हा किंवा वाईट नाही की यांच्या उन्मुलनाची चिंता केली जावी. सभ्यतेच्या बिघाड्याच्या दुसऱ्या कारणांनी जे (बिघाड) निर्माण करतात, त्यांच्या मौलिक कारणाला न जाणता खूप लोक घाबरून उठतात. ते कधी वैयक्तिक मिळकतीला, कधी पैशांना, कधी मशीनला, कधी मनुष्याच्या स्वाभाविक समानतेला आणि कधी स्वयं सभ्यतेलाच दोष देऊ लागतात. परंतु वास्तवात रोगाचे हे निर्धारण आणि हा इलाजच चुकीचा आहे. मानव स्वभावाच्या फळस्वरुपात सभ्यतेमध्ये जो विकास होतो आणि यामुळे स्वाभाविक रुपाने ज्या परिस्थिती निर्माण होतात त्यांना थांबविण्याचा प्रत्येक प्रयत्न नादानी आहे. त्याच्या परिणामात सुधाराऐवजी सर्वनाशाची संभावना अधिक आहे. मनुष्याची वास्तविक आर्थिक समस्या ही नाही की सभ्यतेच्या विकासाला कशा प्रकारे रोखले जावे आणि तिच्या स्वाभाविक प्रतिकांना कशा प्रकारे बदलविले जावे, तर वास्तविक समस्या ही आहे की सभ्यतेच्या विकासाच्या स्वाभाविक गतीस कायम ठेवत सामाजिक अत्याचार व अन्यायाला कशा प्रकारे थांबवावे आणि निसर्गाचा हा उद्देश आहे की प्रत्येक प्राण्याला त्याची जिवीका पोहचावी आणि त्या अडचणींना कशा प्रकारे दूर केले जावे ज्यांच्यामुळे कित्येक लोकांची शक्ती आणि योग्यता संसाधनांचा अभाव असल्याकारणाने नष्ट होते.

## अर्थव्यवस्थेच्या बिघाडाची कारणे

आता आपणास पाहायला हवे की बिघाडाची मूळ कारणे कोणती आहेत आणि बिघाड कोणत्या प्रकारचे आहेत?

अर्थव्यवस्थेच्या बिघडण्याचा प्रारंभ आहे अमर्याद स्वार्थीवृत्ती! मग दुसरा प्रकार नैतिक ऱ्हास आणि एक विकृत राजनीतिक व्यवस्थेच्या सहयोगाने ही गोष्ट वाढते आणि पसरते. इथपर्यंत की संपूर्ण अर्थव्यवस्थेला बिघडवून जीवनाच्या उर्वरीत भागांमध्येही आपले विष पसरवून टाकते. व्यक्तिगत मिळकत आणि काही लोकांचे काही लोकांपेक्षा उत्तम आर्थिक स्थितीत असणे या दोन्ही गोष्टी स्वाभाविक आहेत आणि यांच्यात आपल्या जागी कोणतीही खराबी नाही. जर मनुष्याच्या सर्व नैतिक गुणांना संतुलित रूपात संधी मिळाली असता आणि बाह्य रूपानेही एक असे सरकार अस्तित्वात असते ज्याने आपल्या शक्तीने न्यायाची स्थापना केली असती तर यामुळे कोणतीही खराबी निर्माण झाली नसती.

परंतु ज्या कारणांनी या बिघाडांना जन्म दिला, ते म्हणजे स्वभावत: ज्याची आर्थिक स्थिती चांगली होती, ते स्वार्थपरता, संकीर्णता, अदूरदर्शिता, लोभ, कंजूषी,

बेईमानी आणि आपल्या इच्छांच्या पूजेत मग्न राहिले. सैतानाने त्यांची समजूत घातली की तुमच्या वास्तविक आवश्यकतेपेक्षा अधिक जीवनाचे संसाधन जे तुम्हाला मिळतात आणि जे तुमच्या मिळकतीत आहेत, त्यांचे योग्य आणि उचित उपयोग फक्त दोनच आहेत. एक हे की यांना आपल्या सुख-सुविधा, मनोरंजन आणि ऐशोआरामामध्ये लावा आणि दुसरे हे की यांच्या आणखी अधिक संसाधनांवर कब्जा करण्यासाठी उपयोग करा आणि झालेच तर यांच्याच मदतीने मानवांचे देव (भगवान) बनून जा.

पहिल्या सैतानी मार्गदर्शनाचा परिणाम हा झाला की भांडवलदारांनी समाजाच्या त्या लोकांचा अधिकार मानण्यास विरोध केला जे संपतीच्या वाटपांत हिस्सा मिळण्यापासून वंचित राहतात किंवा आपल्या मूलभूत आवश्यकतांपेक्षा कमी हिस्सा मिळवितात. त्यांनी याला वैध समजले की त्या लोकांना उपासमार आणि दयनीय दशेत सोडून दिले जावे. ते आपल्या संकीर्ण दृष्टीच्या कारणामुळे हे पाहू शकले नाहीत. या वागणुकीने समाजाचे बरेचसे लोक अपराधाच्या मार्गावर चालू लागतात, अज्ञान आणि नैतिक पतनाचे शिकार होतात. शारीरिक अशक्तपणा आणि रोगांमध्ये ग्रस्त होतात. त्यांची शारीरिक शक्ती न विकसित होऊ शकते न मानव सभ्यतेच्या विकासात आपले योगदान देऊ शकते आणि याद्वारे त्या समाजाला सामूहिक हानी पोहचते, ज्याचे भांडवलदारसुद्धा एक अगं आहेत. यावरच फक्त नाही तर या भांडवलदारांनी आपल्या वास्तविक आवश्यकतांपेक्षा पुढे जाऊन अगणित आवश्यकतांची अभिवृद्धी केली. जेव्हा की त्या मानवांच्या योग्यतांना, सभ्यतांना आणि संस्कृतींना चांगल्यात चांगल्या सेवांमध्ये लावले जाऊ शकले असते. आपल्या स्वत:च्या वाढलेल्या गरजांना पूर्ण करण्यासाठी मानवाने वापर करण्यास प्रारंभ केला. त्यांच्यासाठी व्यभिचार एक आवश्यकता बनली. त्यांच्यासाठी व्यभिचारणी स्त्रिया आणि निर्लज्ज व्यक्तींचे एक सैन्य तयार झाले आणि त्यांच्यासाठी संगीताचीही आवश्यकता भासू लागली. त्यासाठी गायकांचा, नर्तक-नर्तिकांचा, नृत्यांगणांचा, वाद्यक आणि वाद्ययंत्र तयार करणाऱ्यांचा एक गट निर्माण केला गेला. त्यांच्यासाठी ना-ना प्रकारच्या मनोरंजनाचीसुद्धा आवश्यकता होती. ज्यांच्यासाठी कथनकारांचा, चित्रकारांचा, विदूषकांचा, सोंगाड्यांचा, अभिनेत्यांचा, अभिनेत्रींचा तसेच अनेक फाजील धंदेवाईकांचा आणखी एक खूप मोठा गट निर्माण केला गेला. त्यांच्यासाठी शिकारसुद्धा आवश्यक होती, ज्याच्यासाठी अनेक लोकांना चांगल्या कामावर लावण्याऐवजी त्यांना जंगलांमध्ये जनावरांना हाकण्यास लावून दिले. त्यांच्यासाठी आनंदरस आणि आत्मविस्मृती ही एक गरज होती. यासाठी अनेक माणसे, दारू, कोकेन, अफीम आणि दुसरे मादक पदार्थ निर्माण करण्यावर लावले गेले. सारांश हा की सैतानाच्या या बांधवांनी एवढ्यावरच दया केली नाही तर निर्दयतेने समाजाच्या एका मोठ्या भागाला नैतिक शारीरिक आणि आध्यात्मिक भ्रष्टतेत ग्रस्त होण्यासाठी सोडून दिले. याव्यतिरिक्त

अन्याय हासुद्धा केला की समाजाच्या आणखी एका मोठ्या भागाला योग्य आणि उपयोगी कामांपासून हटवून अशिष्ट, अपमानजनक आणि हानिकारक कामांमध्ये लावून दिले आणि सभ्यतेच्या गतीला योग्य मार्गाशी वेगळे करून अशा मार्गाकडे वळवून दिले जे मानवांना भ्रष्टतेकडे (नष्टतेकडे) घेऊन जाणारे आहेत. मग मामल्याचा अंत येथेच झाला नाही. मानवसंपत्तीला नष्ट करण्यासोबत त्यांनी भौतिक संपत्तीचा अयोग्य प्रकारे उपयोग केला. त्यांना महालांची, कोठ्यांची, फुलवाड्यांची, मनोरंजनाच्या स्थळांची, नाचघरांची, आदीची गरज पडली, इथपर्यंत की मेल्यानंतर जमिनीवर पहुडण्यासाठी या महाशयांना शेकडो एकर जमीन आणि आलिशान भवनांची गरज भासली. याप्रकारे ती जमीन, ते निर्मितीचे सामान, तो मानवी श्रम जो अनेक लोकांच्या राहण्याचा प्रबंध करण्यासाठी पुरेपूर होता, एक-एक विलासी माणसाच्या आवास आणि स्थाई ठिकाणांवर लावला गेला. त्यांना आभूषणांची, उत्तम वस्त्रे, उत्कृष्ट यंत्र, भांडी, श्रृंगार आणि साजसज्जेच्या वस्तू, शानदार सवारी आणि न जाणो कोणकोणत्या वस्तूंची गरज भासली. इथपर्यंत की या अत्याचारींचे दरवाजेसुद्धा किमती पडद्याविना विवस्त्र समजले जात होते. त्यांच्या भिंतीसुद्धा शेकडो आणि हजारो रुपयांच्या चित्रांनी सुसज्जित झाल्याशिवाय राहू शकत नव्हत्या. त्यांच्या खोल्यांची जमीनसुध्दा हजारो रुपयांची कालीन पांघरू इच्छित होती. त्यांच्या कुत्र्यांनादेखील मखमली गाद्या आणि सोन्याच्या पट्ट्यांची गरज होती. या प्रकारे ती खूप अशी सामुग्री आणि प्रचुर मानवश्रम जे हजारो लोकांचे शरीर झाकण्यासाठी आणि पोट भरण्याच्या कामी येऊ शकत होते, त्यास एकेका व्यक्तीच्या विलासिता आणि अय्याशीवर लावून दिले गेले.

हा सैतानी मार्गदर्शनाच्या एका भागाचा परिणाम होता. दुसऱ्या मार्गदर्शनाचे परिणाम यापेक्षाही अधिक भयानक आहेत. हा सिध्दान्त की एखाद्या व्यक्तीच्या ताब्यात त्याच्या आपल्या गरजेपेक्षा जास्त जीविकांची साधने आलेली असतील त्यांना तो एकत्रित करीत चालला आणि मग अधिक जीविकेची साधने प्राप्त करण्यासाठी वापर करीत राहिला. हे तर स्पष्ट व चुकीचे आहे. विदित आहे की ईश्वराने जीविकेची जी सामग्री पृथ्वीवर निर्माण केली आहे, तिला सजीवांच्या वास्तविक गरजा पूर्ण करण्यासाठी निर्माण केली आहे. तुमच्याजवळ सुदैवाने जर काही अधिक सामुग्री आलेली आहे तर तो दुसऱ्यांचा वाटा होता, जो तुमच्यापर्यंत पोहोचलेला आहे. याला एकत्र करण्यास कुठे चालले? आपल्या चौफेर बघा, जे लोक जीवनसामग्रीतून आपला वाटा प्राप्त करण्यास अयोग्य दिसतील किंवा त्यास प्राप्त करण्यात असफल राहून गेलेले आहेत किंवा ज्यांनी आपल्या गरजेपेक्षा कमी मिळविले आहे, समजून घ्या की हेच ते लोक आहेत ज्यांचा वाटा तुमच्यापर्यंत पोहोचला आहे. ते प्राप्त करु शकले नाहीत तर तुम्ही त्यांच्यापर्यंत पोहचवून द्या. हे योग्य काम करण्याऐवजी जर तुम्ही त्या सामानांचा आणखी अधिक आर्थिक

संसाधन प्राप्त करण्यासाठी उपयोग कराल तर हे चुकीचे काम होईल, कारण कोणत्याही परिस्थितीत तुम्ही ती अतिरिक्त सामग्री जी मिळवाल तुमच्या गरजेपेक्षा आणखी जास्त होईल. मग यांना प्राप्त करण्याचा प्रयत्न करत राहणे आणि आपल्या वाढीव इच्छा-आकांक्षाना पूर्ण करत यापेक्षा अधिक भ्रष्टतेचा भाग कोणता असू शकतो? जीविकेच्या वस्तू प्राप्त करण्याच्या प्रयत्नांत तुम्ही तुमचा वेळ, श्रम आणि योग्यतेचा जितका भाग आपल्या जीवनाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी खर्च करता, त्याचा व्यय तर उचित रुपात होत असतो. पण या मौलिक आवश्यकतेपेक्षा अधिक वस्तूंचा या कामात लावण्याचा अर्थ होतो की तुम्ही आर्थिक पशु नव्हे तर धन निर्माण करण्याचे यंत्र बनत आहात. परंतु तुम्हाला वेळ, श्रम, मानसिक आणि शारीरिक शक्तीसाठी अर्थोपार्जनाशिवाय आणखी चांगली कामेसुद्धा आहेत. बुध्दी आणि निसर्गाच्या प्रमाणानुसार हा सिध्दान्त संपूर्ण चुकीचा आहे. जो सैतानाने आपल्या शिष्यांना शिकविला आहे. परंतु या सिध्दान्ताच्या आधारावर ज्या व्यापारिक पध्दती बनविल्या गेल्या आहेत त्यांचे परिणाम इतके भयानक आहेत की त्यांचा योग्य अंदाज करणेही अत्यंत कठीण आहे.

गरजेपेक्षा जास्त अर्थसाधनांना व अधिकाधिक संसाधनांना ताब्यात आणण्यासाठी उपयोग करण्याचे दोन प्रकार आहेत.

१) या साधनांना व्याजावर कर्ज दिले जावे.

२) त्यांना व्यापारिक आणि औद्योगिक कार्यांमध्ये लावले जावे.

या दोन्ही विधी आपल्या निसर्गात एकदुसऱ्यापेक्षा वेगळ्या जरुर आहेत, परंतु दोन्हींचा संयुक्त रुपाने व्यवहृत असण्याचा स्वाभाविक परिणाम हा होत असतो की समाज दोन वर्गांमध्ये विभागला जातो.

१) एक तो अल्प वर्ग जो आपल्या गरजांपेक्षा अधिक संसाधन बाळगतो आणि आपल्या साधनांना आणखी संसाधन प्राप्त करण्यासाठी लावून देत असतो.

२) दुसरा तो मोठा वर्ग जो आपल्या आवश्यकतांनुसार किंवा त्यापेक्षाही कमी संसाधन ठेवत असतो किंवा काहीच ठेवीत नाही. या दोन्ही वर्गांचे हित फक्त एकदुसऱ्यांच्या विरुद्धच राहत नाहीत तर त्यांच्यात संघर्ष आणि विवाद उभा राहात असतो. याप्रकारे मानवाची अर्थव्यवस्था निसर्गाने विनिमय आणि पारस्पारिक देवाण-घेवाणाला ज्याचा आधार बनविला होता, तो एक प्रकारे पारस्पारिक युध्दात स्थापित होऊन राहून जातो.

मग हा संघर्ष जितका वाढत जातो, श्रीमंतवर्ग संख्येत कमी आणि गरीबवर्ग अधिक होत जातो, कारण हा संघर्ष आहेच काही अशा प्रकारचा की जो जास्त श्रीमंत आहे तो आपल्या धनाच्या जोरावर कमी धनवान लोकांचे संसाधनसुद्धा ओढून घेतो आणि त्याला गरीबवर्गात

लोटून देतो. याप्रकारे पृथ्वीचे आर्थिक संसाधन दिवसेंदिवस लोकसंख्येच्या कमीतकमी भागाजवळ जमा होते आणि दिवसेंदिवस लोकसंख्येचा जास्तीतजास्त भाग गरीब किंवा धनवानांचा आश्रित होत जातो.

प्रारंभी हे युद्ध आणि संघर्ष लहान प्रमाणावर सुरु होते. मग वाढत वाढत देश आणि राष्ट्रांपर्यंत पसरते. इथपर्यंत की सर्व जगाला आपल्या सापळ्यात घेऊनसुध्दा त्याचे पोट भरत नाही. प्रकार हा आहे की जेव्हा एका देशाचा सार्वत्रिक कायदा हा होऊन जातो की ज्या लोकांजवळ आपल्या आवश्यकतेपेक्षा जास्त धन असेल, त्यांनी आपला अतिरिक्त माल लाभकारी कामांमध्ये लावावा आणि हा माल गरजेच्या सामग्री निर्माणावर खर्च व्हावा. तर त्यांच्या लावलेल्या पूर्ण रकमेचे लाभासोबत परतणे या गोष्टीवर अवलंबून असते की जितक्या वस्तू देशात तयार झाल्या आहेत, त्या सर्वच्या सर्व त्याच देशात विकत घेतल्या जाव्यात. परंतु व्यवहारत: असे होत नाही आणि वास्तवात हे होऊही शकत नाही. कारण गरजेपेक्षा कमी माल (धन) ठेवणाऱ्यांची क्रयशक्ती कमी असते आणि आवश्यकतेपेक्षा जास्त धन ठेवणाऱ्यांना ही चिंता असते की जितकी मिळकत व्हावी त्यातून एक भाग वाचवून लाभकारी कामांत लावावा. यासाठी ते आपले सर्व धन खरेदीवर खर्च करत नाहीत. या प्रकारे अनिवार्य रूपाने तयार केलेल्या मालाचा एक भाग न विकता राहून जातो. ज्याचा दुसरा अर्थ हा आहे की भांडवलदारांनी लावलेल्या रक्कमेचा एक भाग न गुंतविता राहून गेला आणि ही रक्कम देशाच्या उद्योगावर कर्ज म्हणून राहिली. ही केवळ एका चक्राची परिस्थिती आहे. तुम्ही अनुमान करु शकता की अशी जितकी चक्रे होतील त्यातून प्रत्येकात श्रीमंतवर्ग आपल्या प्राप्त आवकेचा एक भाग पुन्हा लाभकारी कामांमध्ये लावत जाईल आणि जी रक्कम परत मिळण्यापासून राहिलेली आहे त्याचे प्रमाण प्रत्येक चक्रात वाढत जाईल. तसेच देशाच्या उद्योगावर अशा कर्जाचे ओझे दुप्पट, चौपट, हजारपट होत जाईल. ज्याला तो देश स्वत: कधी फेडू शकत नाही. याप्रकारे एका देशाला दिवाळखोरीचा जो धोका येऊन उभा राहतो त्यापासून वाचण्याचा उपाय याशिवाय काही नाही की जितका माल देशात विकण्याचा राहून जातो, त्याला दुसऱ्या देशांमध्ये नेऊन विकावा. म्हणजे असे देश शोधावेत ज्यांच्याकडे हे देश आपल्या दिवाळीखोरीला स्थलांतरित करुन टाकतील.

याप्रकारे हे युध्द किंवा संघर्ष देशाच्या सीमांवरून पार करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात पाय ठेवतात. आता हे स्पष्ट आहे की कोणी एक देशच असा नाही की जो या सैतानी व्यवस्थेवर चालत असेल. जगाच्या सर्वच देशांची ही स्थिती आहे. ते स्वत: आपल्याला दिवाळखोरीपासून वाचविण्यासाठी किंवा दुसऱ्या शब्दांत आपल्या दिवाळखोरीला एखाद्या दुसऱ्या देशावर टाकून देण्यास विवश झाले आहेत. याप्रकारे आंतरराष्ट्रीय प्रतिस्पर्धा सुरु होते आणि ती काही रुपांमध्ये विभागली जाते.

१) प्रत्येक देश आंतरराष्ट्रीय बाजारात आपला माल विकण्याचा प्रयत्न करतो. कमीतकमी लागवडीवर अधिकाधिक माल तयार करावा या उद्देशाने कर्मचाऱ्यांचे वेतन खूप कमी ठेवले जाते. त्यामुळे आर्थिक व्यवहारात देशाच्या सामान्य जनतेला इतका कमी वाटा मिळतो की तिच्या मौलिक गरजाही पूर्ण होत नाहीत.

२) प्रत्येक देश आपल्या सीमेत आणि त्या क्षेत्रात जे त्याच्या प्रभावत असतात, दुसऱ्या देशाचा माल येण्यावर प्रतिबंध लावतो. कच्च्या मालाच्या उत्पादनाची जितकी साधने त्याच्या अधिकारात आहेत, त्यांच्यावरही पहारा बसवितो, कारण दुसरा त्यांपासून लाभ घेऊ शकणार नाही. याने आंतरराष्ट्रीय संघर्ष निर्माण होतो. ज्याचा परिणाम युध्द आहे.

३) जे देश या दिवाळखोरीच्या संकटाला आपल्या डोक्यावर येण्यापासून रोखू शकत नाहीत, त्यांच्यावर लुटारू तुटून पडतात आणि फक्त आपल्या देशाचा उरलासुरलेला माल त्यांच्यात विकण्याचा प्रयत्न करीत नाहीत तर ज्या धनाला स्वत: आपल्या इथे लाभकारी कामांमध्ये लावण्याची आवश्यकता राहत नाही, त्यालाही त्या देशांमध्ये नेऊन लावतात. याप्रकारे शेवटी त्या देशांमध्येही तीच समस्या निर्माण होऊन जाते जी प्रारंभी पैसा लावणाऱ्या देशांमध्ये निर्माण झाली होती. म्हणजे जितका पैसा तिथे लावला जातो, तो सर्वच्या सर्व वसूल होऊ शकत नाही. त्या पैशाने जितकी मिळकत होते, तिचा एक मोठा भाग पुन्हा त्यापेक्षा अधिक लाभकारी कामांमध्ये लावून दिला जात असतो, इथपर्यंत की त्या देशांवर कर्जाचे ओझे इतके वाढत जाते की त्या देशांना स्वयं विकून दिले गेले तरीसुद्धा लावलेल्या एकूण रकमेची परतफेड होऊ शकत नाही.

स्पष्ट आहे की हे चक्र चालत राहिले तर शेवटी सर्व विश्व दिवाळखोर होऊन जाईल आणि धरतीवर असा कोणताही भू-भाग शिल्लक राहणार नाही, ज्याच्याकडे या दिवाळखोरीच्या संकटाला स्थानांतरित केले जाऊ शकेल. मग ही आवश्यकता भासते की मंगळ, बुध आणि शुक्र ग्रहांमध्ये पैसे लावले जावेत आणि अतिरिक्त माल खपविण्यासाठी बाजार शोधले जावेत.

या जागतिक संघर्षात किंवा बँका, पतपेढ्या आणि उद्योग व्यापाऱ्यांची, भांडवलदारांची लहानशी टोळी, सर्व जगाची आर्थिक सामग्री आणि संसाधनांवर याप्रकारे प्रभावी झालेली आहे. समस्त मानवजात त्यांच्या विरोधात पूर्णपणे निरुपाय झालेली आहे. आता कोण्या व्यक्तीसाठी हे असंभव झालेले आहे की तो आपल्या कष्टाने आणि आपल्या बुद्धीच्या योग्यतेने एखादे काम स्वतंत्र रुपाने करु शकेल. तसेच ईश्वराच्या धर्तीवर अस्तित्वात असलेल्या जीवनसामग्रीमधून स्वत: काही भाग प्राप्त करु शकेल. लहान व्यापारी, लहान कारागीर आणि लहान शेतकऱ्यांसाठी आज जगात हात-पाय मारण्याची काहीएक संधी बाकी राहिलेली नाही. सर्वच्या सर्व भांडवलदार महाराजांचे गुलाम आणि

नोकर, तसेच मजूर बनण्यास विवश आहेत. हे लोक कमीतकमी जीवनसामग्रीच्या मोबदल्यात त्यांच्या शरीर आणि बुद्धीच्या सर्व शक्ती आणि त्यांचा पूर्ण वेळ घेतात. या कारणस्तव सर्व मानवजात एक आर्थिक पशु बनून राहिलेली आहे. खूप कमी भाग्यशाली लोकांना या आर्थिक संघर्षामध्ये इतका वेळ मिळू शकतो की आपल्या नैतिक आणि आध्यात्मिक विकासासाठीही काही करु शकतील. कोण अशा उद्देशाकडे लक्ष देऊ शकेल जो पोट भरण्याच्या उद्देशापेक्षा श्रेष्ठ आहे? आपल्या व्यक्तित्वाच्या त्या तत्त्वांना विकसित करु शकेल जे उपजीविकेच्या शोधापेक्षा दुसऱ्या पवित्रमय उद्देशासाठी ईश्वराने त्यांच्यामध्ये ठेवले होते? वास्तवात या सैतानी व्यवस्थेमुळे आर्थिक संघर्ष इतके कठोर रुप धारण करते की जीवनाचे इतर दुसरे विभाग यामुळे निष्क्रिय होऊन जातात.

यापेक्षाही मोठे मानवाचे दुर्भाग्य हे आहे की जगाचे नैतिक दर्शन, राजनीतिक व्यवस्था आणि कायदे सिध्दान्त या सैतानी अर्थव्यवस्थेने प्रभावित झाले आहेत. पूर्वेपासून ते पश्चिमेपर्यंत नैतिकतेचे आचार्य अतिरिक्त खर्चापासून वाचण्यावर जोर देत आहेत. जितके कमवायचे, तितकाच खर्च करून टाकणे एक मूर्खता आणि एक नैतिक दोष समजला जातो. प्रत्येक व्यक्तीला शिकवण दिली जाते की आपल्या मिळकतीतून काही न काही वाचवून बँकेत डिपॉझिट ठेवावे अथवा विमा पॉलिसी खरेदी करावी अथवा कंपन्यांचे शेअर खरेदी करावेत. म्हणजे जी गोष्ट मानवतेचा विनाश करणारी आहे तीच नैतिकतेच्या दृष्टीत चांगुलपणाचे मापदंड करणारी ठरलेली आहे. राहिली राजनीतिक शक्ती तर ती व्यवहारत: पूर्णपणे एका सैतानी व्यवस्थेच्या ताब्यात आलेली आहे. ती या अत्याचारापासून मनुष्याला वाचविण्याऐवजी स्वत: अन्याय करणारी मशीन झालेली आहे. चहुकडे शासनाच्या खुर्च्यांवर सैतानाचे एजंट बसलेले दिसतात. याप्रकारे जगाचे कायदेसुध्दा या व्यवस्थेच्या प्रभावांतर्गत संयोजित होत आहेत.

या कायद्यांनी लोकांना व्यवहारत: पूर्ण सूट देऊन ठेवली आहे की ते ज्याप्रकारे इच्छितील समाजहिताच्या विपरीत आपल्या आर्थिक उद्देशांसाठी प्रयास करतील. पैसे कमविण्याच्या पध्दतीत वैध आणि अवैधतेचा फरक जवळजवळ लुप्त झालेला आहे. प्रत्येक ती पध्दत जिच्याने व्यक्ती दुसऱ्यांना लुटून अथवा नष्ट करुन धनवान बनू शकतो, कायद्याच्या दृष्टीत पात्र आहे. दारू बनवा आणि विका, व्यभिचाराचे अड्डे स्थापन करा, कामोत्तेजक चित्रपट बनवा, अश्लील निबंध लिहा, वासनालय, भावना भडकविणारी चित्रे प्रकाशित करा, सट्ट्याचा त्यावर व्यवहार पसरवा, व्याजखोरीच्या संस्था स्थापन करा आणि जुगाराच्या नवनवीन पध्दती काढा. सारांश हा की जे वाटेल ते करा, कायदा फक्त तुम्हाला याची परवानगीच देणार नाही तर तुमच्या अधिकारांचे रक्षणही करेल. याप्रकारे जे धन एका व्यक्तीजवळ जमा झालेले असेल, कायदा इच्छितो की ते त्याच्या मृत्यूनंतरही एकाच जागेवर जमून राहावे. मोठ्या मुलाचा वारस बनण्याचा नियम आणि काही कायदे बनविण्याची पध्दत

आणि संयुक्त परिवाराचा नियम या सर्वांचा उद्देश हाच आहे की खजिन्याचा एक साप मेला तर त्याच्यावर दुसरा साप बसवून दिला जाईल. दुर्भाग्याने त्या सापाने जर एखादा गारुडी सोडला नसेल तर दुसरीकडून गारुडी निर्माण केला जाईल, कारण धनाच्या या जमावात कोणतेही अंतर येऊ नये.

या कारणांनी मानवजातीसाठी ही समस्या निर्माण झाली आहे की ईश्वराच्या या धरतीवर प्रत्येक व्यक्तीला कोणत्या प्रकारची जीवनसामग्री पोहचविण्याचा प्रबंध केला जाईल. अशा स्थितीत व्यक्तीला त्याच्या योग्यतेनुसार विकास करण्याचा आणि आपल्या व्यक्तित्वाला विकसित करण्याचा अवधी कसा मिळेल?

## साम्यवादाचा प्रास्तावित उपाय

या समस्येचा एक उपाय साम्यवादाने प्रस्तुत केलेला आहे. तो हा आहे की धन उत्पादनाच्या साधनांना वैयक्तिक मिळकतीतून काढून राष्ट्रीय मिळकतीचे बनवून दिले जाते. लोकांमध्ये उपजीविका वाटण्याचे काम राष्ट्राला सोपविले जाते. पाहण्यात हा उपाय अत्यंत योग्य वाटतो, परंतु याच्या व्यावहारिक बाबींवर जितके लक्ष द्याल तितके त्याचे दोष आपल्यासमोर येत जातील इथपर्यंत की तुम्हाला स्वीकार करावा लागेल की शेवटी याचे परिणामही तितकेच वाईट आहेत जितके त्या आजाराचे परिणाम आहेत, ज्याचा उपचार करण्यासाठी याचा अवलंब केला गेला आहे. ही एकदम स्पष्ट झालेली गोष्ट आहे की उत्पादनाच्या साधनांशी काम घेणे आणि निर्मिती करण्याचा प्रबंध जर सैध्दान्तिकपणे पूर्ण राष्ट्र किंवा समाजाच्या हवाली करून दिला जातो, परंतु हे काम एका लहानशा प्रशासनिक व्यवस्थेच्या सुपूर्द करावे लागते. ही लहान टोळी सुरवातीला समाजाचीच निवडलेली खरी, परंतु जेव्हा जीविकेची सर्वच साधने त्यांच्या हाती येतात आणि त्यांच्याच हाताने लोकांच्या हाती पोहचतात तेव्हा सर्व लोकसमूह त्यांच्या मुठीत विवश होऊन जातो. त्यांच्या इच्छेविरुध्द देशात कोणताही व्यक्ती श्वाससुद्धा घेऊ शकत नाही आणि न ही त्यांच्या विरोधात कोणी असा संघटित गट उभा करू शकतो जो त्यांना पदावरून आणि प्रभुत्वावरून हटवू शकेल. कोणावरून त्यांची दृष्टी हटण्याचा अर्थ हा होईल की तो या पृथ्वीवर जीवन व्यतीत करण्याच्या सर्व साधनांपासून वंचित होऊन जाईल, कारण सर्व संसाधनांवर त्या लहान गटाचाच ताबा राहील. मजुरांमध्ये इतकी शक्ती आणि साहस नसेल की त्यांच्या व्यवस्थेशी नाराज व्हावे व संप करून टाकावा कारण तिथे खूप उद्योगपती नसतील की जर कोणी एकाच्या दारावरून उठला तर दुसऱ्या दारावर जाईल. तिथे संपूर्ण देशात एकच उद्योगपती असेल आणि तो शासकही असेल. त्याविरुद्ध कोणत्या जनमताची सहानुभूतीसुद्धा प्राप्त केली जाऊ शकणार नाही. या स्थितीचा तो अंतिम परिणाम असेल. सर्व भांडवलदारांना खाऊन एक मोठा भांडवलदार, सर्व उद्योगपतींना आणि जमीनदारांना खाऊन एक मोठा उद्योगपती आणि जमीनदार लोकांवर प्रभावी ठरेल.

सर्वांत पहिली गोष्ट तर ही की राज्यसत्ता आणि अशी निरंकुश सत्ता ती वस्तू आहे जिच्या नशेत वाहवून, बहकून क्रूर आणि अत्याचारी बनण्यापासून वाचणे मानवासाठी खूप कठीण आहे. विशेषरूपाने तेव्हा आपल्यावर कोणी ईश्वरासमोर उत्तरदायी असण्याचा विश्वाससुद्धा ठेवत नसेल. निरंकुश सत्तेवर कब्जा जमविल्यानंतरसुध्दा लहानसा गट तुमच्यापासून बाहेर असणार नाही आणि न्यायासोबतच काम करेल. या व्यवस्थेतसुध्दा व्यक्तीसाठी आपले व्यक्तित्व विकसित करण्यासाठी सर्वांत अधिक गरज स्वातंत्र्याची असते. काही साधने तिच्या हातात असावीत, ज्यांना ती आपल्या अधिकारांनी वापरू शकेल. तसेच त्या साधनांवर आपल्या रुचीनुसार स्वत:मध्ये लपलेल्या शक्तींना वाढवावे आणि चमकवावे. परंतु साम्यवादी व्यवस्थेत त्याची कोणतीही संभावना नाही. कारण या व्यवस्थेत साधने लोकांच्या अधिकारात राहात नाहीत, तर ती समाजाच्या प्रशासनिक व्यवस्थेच्या हातात जातात. प्रशासनिक व्यवस्था सामाजिक हिताची जी धारणा ठेवत असते, तिच्यानुसारच त्या साधनांना कामात आणते. लोकांसाठी याशिवाय दुसरा काहीही उपाय नाही की त्या साधनांपासून ते लाभ घेऊ इच्छित असतील तर त्या चौकटीतच काम करावे लागेल. त्याच आराखड्यानुसार जो प्रबंधकांनी सामाजिक हितासाठी प्रस्तुत केलेला आहे स्वत:ला घडविण्यासाठी स्वत:ला या प्रबंधकीपुढे सोपवून द्यावे लागेल. अशा प्रकारे समाजाच्या सर्वच लोकांना काही लोकांच्या अधिकारांत (कब्जात) देऊन टाकले जाते जणू ते सर्व निर्जीव कच्चा माल आहेत. जसे चामड्याचे बूट (जोडे), लोखंडाचे अवयव बनविले जातात, त्याच प्रकारे ते थोडेसे लोक याचा अधिकार बाळगतात की अनेक अशा लोकांना आपल्या मर्जीप्रमाणे घडवावे आणि बनवावे.

मानवी सभ्यता आणि संस्कृतीसाठी हे इतके अधिक हानीकारक आहे की जर थोड्या वेळासाठी आम्ही मानून घेतले की या प्रणालीच्या अंतर्गत जीवनसामग्री न्यायासोबत वितरीत होईल, तर याचा लाभ या हानीपेक्षा नगण्य होऊन जातो. सभ्यता आणि संस्कृतीचा पूर्ण विकास या गोष्टीवर निर्भर करतो की विभिन्न व्यक्ती ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या शक्ती आणि योग्यता घेऊन जन्मतात त्यांना पूर्णपणे विकसित करण्यासाठी या संयुक्त जीवनात त्यांना त्यांचा वाटा देण्यासाठी संधी उपलब्ध व्हावी. ही गोष्ट अशा प्रणालीत शक्य नाही ज्यात मानवांचे नियोजन केले जाते. थोडेसे लोक जरी ते कितीही योग्य आणि शुभचिंतक असोत, इतके ज्ञानवान आणि माहिती राखणारे होऊ शकत नाहीत की लाखो आणि करोडो व्यक्तींच्या जन्मत: योग्यतांचा आणि त्यांच्या स्वाभाविक आवडींचा अचूक अंदाज करू शकतील, तसेच त्यांच्या विकास आणि उन्नतीचा योग्य मार्ग निश्चित करू शकतील. ते या अज्ञानामुळे चुका करतील आणि सामाजिक हित अथवा सामाजिक गरजांच्या संबंधांत त्यांचा जो अंदाज असेल, त्यांच्या दृष्टीनेही इच्छितील की आपल्या प्रभावाखालील मानवी लोकसंख्या घडवून दिली जावी. याने सभ्यतेच्याच

रंगारंगीचा अंत होईल आणि ती एक निर्जीव समानतेचे रुप धारण करील. यामुळे सभ्यतेचा स्वाभाविक विकास थांबेल आणि एक प्रकारचा कृत्रिम विकास सुरु होईल. परिणामत: मानवी शक्ती गोठत जातील आणि शेवटी एका मोठ्या मानसिक आणि नैतिक ऱ्हासाचा सामना त्यांना करावा लागेल. मनुष्य गवत आणि वेली नाहीत की त्यांना काटून-छाटून व्यवस्थित करून घ्यावे आणि ते विशिष्ट नियोजनानुसार वाढत व घटत जावेत. प्रत्येक व्यक्ती आपली एक विशिष्ट ओळख ठेवते जी आपल्या स्वाभाविक गतीने वाढू इच्छिते. तुम्ही तिचे हे स्वातंत्र्य नियोजनानुसार हिरावून घ्याल तर ती तुमच्या इच्छेप्रमाणे वाढणार नाही तर विद्रोह करेल अथवा कोमेजून जाईल.

## फॅसिस्टवादी उपाय

वास्तवात: साम्यवादी दृष्टिकोन मनुष्याच्या आर्थिक समस्येचा काही खरा स्वाभाविक उपाय नाही तर एक अस्वभाविक आणि कृत्रिम उपाय आहे. याच्या विरोधात दुसरा उपाय फॅसिस्टवाद आणि राष्ट्रीय समाजवादाने प्रस्तुत केलेला आहे तो म्हणजे आर्थिक साधनांवर व्यक्तिगत अधिकार उरलेला राहावा परंतु सामाजिक हितासाठी या अधिकाराला राज्याच्या कडक नियंत्रणात ठेवले जावे. व्यवहारात याचे परिणामसुद्धा साम्यवादी दृष्टिकोनाच्या परिणामांपेक्षा फारसे वेगळे दिसून येत नाहीत. साम्यवादाप्रमाणेच हा दृष्टिकोनसुद्धा माणसाला समष्टीत लुप्त करून टाकतो आणि त्याच्या व्यक्तित्वात स्वतंत्र विकासाची कोणतीही संधी शिल्लक सोडत नाही. याव्यतिरिक्त जे सरकार या व्यक्तिगत अधिकाराला नियंत्रणात ठेवते, ते तितकेच क्रूर आणि निरंकुश असते जितके साम्यवादी सरकार! एका मोठ्या देशाच्या सर्वच उद्योगांना आपल्या नियंत्रणात ठेवण्यात आणि दिलेल्या आराखड्यात राहून काम करण्यास विवश करण्यासाठी एका मोठ्या प्रभावशाली शक्तीची आवश्यकता असते. ज्या सरकारच्या हाती अशी प्रभावशाली शक्ती असते त्याच्या हातात देशाची जनता विवश आणि निरुपाय होऊन जाते आणि शासकांची गुलाम बनून राहणे अवश्यभावी आहे.

## इस्लामी उपाय

आता मी हे दाखवीन की इस्लाम कशा प्रकारे या समस्येला सोडवितो.

१) इस्लामने जीवनाच्या सर्वच समस्यांना या नियमात समोर ठेवले आहे की जीवनाचे जे सिध्दान्त स्वाभाविक आणि नैसर्गिक आहेत, त्यांना शिल्लक ठेवले जावे आणि जिथे ते नैसर्गिक मार्गाने विचलित झाले आहे, तिथूनच त्याला वळवून नैसर्गिक मार्गावर लावून दिले जावे.

२) दुसरा महत्त्वपूर्ण नियम ज्यावर त्याची सर्वच सुधारात्मक कार्ये निर्भर असतात, तो हा आहे की समाजाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये केवळ काही वरवरचे उपाय लागू करण्यावर न

थांबता, सर्वात जास्त जोर नैतिक आणि मानसिक सुधारावर दिला जावा. कारण मानवी मनात निर्माण होणाऱ्या बिघाडाची मुळे कापली जावीत.

३) तिसरा मौलिक नियम ज्याची झलक आपणास संपूर्ण इस्लामी जीवनप्रणालीत मिळेल, हा आहे की शासनाच्या बळावर आणि कायद्यांच्या शक्तीने फक्त तीच कामे घेतली जावीत जिथे याशिवाय काम चालू शकत नसेल.

या तिन्ही नियमांना दृष्टीसमोर ठेवत इस्लाम जीवनाच्या आर्थिक विभागांमध्ये त्या सर्वच अस्वाभाविक सिद्धान्तांना अधिकाहून अधिक नैतिक सुधार आणि कमीतकमी प्रशासनिक हस्तक्षेपाद्वारे मिटवीत असतो, जे सैतानाच्या प्रभावाने मानवाने अंगीकारले आहेत. मानव आपल्या जीविकेसाठी प्रयास करण्यास स्वतंत्र असावा. मानव आपल्या श्रमाने जे काही प्राप्त करेल ती त्याची मिळकत स्वीकार केली जावी आणि मानवांमध्ये योग्यतांचा आणि त्यांच्या परिस्थितींच्या प्रमाणानुसार अंतर असावे. या सर्व बाबींना इस्लाम त्याच मर्यादेपर्यंत स्वीकार करीत असतो ज्या मर्यादेपर्यंत हे निसर्गाच्या अनुकूल असते. मग तो यांच्यावर असे प्रतिबंध लावीत असतो ज्यांच्यामुळे न ही निसर्गाच्या सीमेच्या पुढे वाढू शकते आणि न अन्याय आणि अत्याचाराचे कारण बनते.

सर्वांत अगोदर धन कमविण्याच्या प्रश्नाला घ्या. इस्लामने मनुष्याच्या या अधिकाराला स्वीकारले आहे. अल्लाहच्या धरतीवर आपल्या रुची, क्षमता आणि योग्यतेनुसार स्वत: आपली जीविकेला त्याने शोधावी. परंतु तो त्याला हा अधिकार देत नाही की त्याने आपली जीविका प्राप्त करण्यासाठी नैतिकतेला बिघडविणारी वा सभ्यतेच्या व्यवस्थेला बिघडविणारी साधने वापरावीत. तो धन कमविण्याच्या साधनांमध्ये अवैध आणि वैधतेचे अंतर निर्धारित करतो. अत्यंत विस्तारासहित वेचून-वेचून प्रत्येक हानिकारक पध्दतीला अवैध करून टाकतो. त्याच्या कायद्यामध्ये दारु आणि दुसरे मादक पदार्थ केवळ आपल्या जागेवर अवैध आहेत तर त्यांचे बनविणे, विकणे, विकत घेणे आणि बाळगणे सर्व अवैध आहे. तो व्यभिचार, संगीत आणि याच प्रकारच्या इतर दुसऱ्या साधनांनासुध्दा संपत्तीच्या कमाईचे वैध (शुध्द) साधन मानत नाही. तो अशा सर्व साधनांना अवैध ठरवितो, ज्यात एका व्यक्तीचा लाभ दुसऱ्या लोकांच्या अथवा समाजाच्या हानीवर निर्भर करीत असेल. लाच, चोरी, जुगार, सट्टा तसेच धोका आणि दगाबाजीचे व्यवहार जमाखोरी, अर्थात गरजेच्या साधनांना यासाठी रोखून ठेवणे की किमती वाढाव्यात. उत्पादनाच्या साधनांना एक व्यक्ती अथवा काही व्यक्तींचा एकाधिकार ठरविणे की दुसऱ्यांसाठी प्रयासक्षेत्र तंग व्हावे. या सर्व पध्दतींना त्याने अवैध ठरविले आहे. याव्यतिरिक्त व्यवसायाच्या अशा सर्व प्रकारांना त्याने वेचून-वेचून अवैध घोषित ठरविले आहे जे आपल्या आकाराच्या दृष्टीने विवाद निर्माण करणारे आहेत. इस्लामच्या या व्यापारिक कायद्याचे विस्तृत रूपाने अध्ययन कराल तर आपणास माहीत होईल की आज

ज्या पध्दतींनी लोक करोडपती बनत आहेत, त्यांच्यातून अधिकांश त्या पद्धती आहेत, ज्यांच्यावर इस्लामने अत्यंत कडक कायदेशीर प्रतिबंध लावले आहेत. तो धन कमविण्याच्या ज्या साधनांना वैध ठरवितो, त्यामध्ये सीमित राहून काम केले तर लोकांसाठी अपार धन जमा करत जाण्याची खूप कमी संभावना शेष राहते.

आता पाहा, मनुष्य मान्य पध्दतीने जे काही प्राप्त करेल, त्याला इस्लाम त्या व्यक्तीची मिळकत म्हणून परवानगी देतो. परंतु तिच्या उपभोगात त्याला पूर्णत: स्वतंत्र सोडत नाही तर त्यावरही अनेक प्रकारे बंधने घालतो. विदित आहे की या कमविलेल्या संपत्तीच्या वापराचे तीन प्रकार संभव आहेत. एकतर ती खर्च करून टाकावी किंवा तिला लाभदायक कामांवर लावले जावे अथवा ती जमा करावी. यामधून एकेकावर इस्लामने जी बंधने घातली आहेत, त्यांना संक्षेपात इथे सांगत आहे.

खर्च करण्याचे जितके प्रकार नैतिकतेला हानी पोहचवितात अथवा ज्यांच्यामुळे समाजाला नुकसान पोहचते ते सर्व वर्जित आहेत. आपण आपली संपत्ती जुगारात उडवू शकत नाही व आपण दारू पिऊ शकत नाही. आपण व्यभिचार करु शकत नाही, आपण गाणे वाजविणे, नाच-रंग आणि विलासितेच्या दुसऱ्या प्रकारांमध्ये आपला पैसा वाहवू शकत नाही. तुम्ही रेशमी वस्त्र परिधान करु शकत नाही. सोने व जवाहीरांच्या दागिन्यांचा वापरही करू शकत नाही. (असे दागिने फक्त स्त्रिया घालू शकतात, पुरुष नव्हे.) आपण छायचित्रांनी आपल्या भिंतींना सजवू शकत नाही. सारांश हा की इस्लामने त्या सर्व दारांना बंद करून टाकले, ज्यांमुळे मानवाच्या संपत्तीचा अधिकांश भाग आपल्या विलासितेवर खर्च होत असतो. तो खर्चाच्या ज्या पध्दतींना मान्य करतो त्या या प्रकारच्या आहेत की माणसाने फक्त एका सामान्य दर्जाचे शिष्टतापूर्ण आणि पवित्र ज़ीवन व्यतीत करावे. त्याहून अधिक जर काही शिल्लक राहात असेल तर त्याला खर्च करण्याचा मार्ग इस्लामने हा सुचविला आहे की त्याला पुण्य आणि भलाईच्या (शुभ) कामामध्ये, जनहितात आणि त्या लोकांच्या सहायता कार्यात खर्च करावे जे आर्थिक संपत्तीमधून आपल्या गरजांनुसार वाटा मिळण्यापासून वंचित राहिले आहेत. इस्लामच्या दृष्टीत सर्वात अधिक योग्य पध्दत ही आहे की माणूस जे काही कमवितो त्याला आपल्या मान्य आणि उचित गरजांवर खर्च करावे आणि मग जे काही शिल्लक राहील त्याला दुसऱ्यांना देऊन टाकावे. म्हणजे ते आपल्या या गुणाला इस्लामने उच्चतम स्तराच्या नैतिकतेत संमिलित केले आहे. एका आदर्शाच्या रूपात याला इतक्या शक्तिनिशी प्रस्तुत केले आहे की जेव्हा कधी समाजात इस्लामी नैतिकतेचा गाजावाजा असेल, सामाजिक जीवनामध्ये ते लोक अधिक आदराच्या दृष्टीने पाहिले जातील जे कमवितात व खर्च करून टाकतात आणि त्या लोकांना चांगल्या दृष्टीने पाहिले जाणार नाही जे संपत्तीला साठवून ठेवण्याचा प्रयत्न करतील किंवा कमविलेल्या संपत्तीतून शिल्लक राहिलेल्या वाट्याला पुन्हा कमविण्याच्या कामी लावतील.

तरीसुध्दा विशुध्द नैतिक शिकवणीद्वारा आणि समाजाच्या नैतिक प्रभाव आणि दबावाने अत्याधिक लोभ आणि लोलुपता ठेवणाऱ्या लोकांच्या कमतरतेचे पूर्णत: उन्मुलन केले जाऊ शकत नाही. असे असतानासुद्धा अनेक असे लोक बाकी राहतील जे आपल्या गरजांपेक्षा अधिक कमविलेल्या संपत्तीला आणखी जास्त संपत्ती कमविण्यात लावू इच्छितात. यासाठी इस्लामने त्याच्या वापराच्या पध्दतींवर काही कायदेशीर प्रतिबंध लावून दिलेले आहेत. या शिल्लक संपत्तीच्या वापराचा हा प्रकार की ज्याला व्याजावर चालविले जावे, इस्लामी कायद्यात पूर्णत: निषिध्द आहे. आपण कोणाला आपला माल कर्जावर देत आहात जरी त्याने ते कर्ज आपल्या गरजांवर खर्च करण्यासाठी घेतले असेल अथवा जीविकेच्या साधननिर्मितीसाठी इ. प्रत्येक दशेत आपण त्यांच्याकडून केवळ आपली मूळ रक्कमच परत घेण्याचे अधिकारी आहोत. याप्रकारे इस्लाम अन्यायावर आधारित भांडवलदारीची कंबर तोडून टाकतो आणि त्या सर्वांत मोठ्या शस्त्राला बोथट करून टाकतो, ज्याच्याद्वारे भांडवलदार केवळ आपल्याच बळावर आसपासच्या आर्थिक धनसंपत्तीला साठवत जात असतो. शिल्लक धनाला व्यक्ती वाटेल तर आपल्या व्यापार, उद्योग अथवा दुसऱ्या व्यवसायात लावो अथवा दुसऱ्याच्या सोबत लाभ-हानीमध्ये सामील होऊन त्याने संपत्ती जमा करावी. इस्लाम याला वैध करार देतो आणि यापेक्षा जे आवश्यकतेपेक्षा अधिक धन लोकांजवळ साठून जाते त्यांचा उपाय तो दुसऱ्या प्रकाराने करीत असतो.

इस्लामने आवश्यकतेपेक्षा अधिक धन जमा करण्यास निषिध्द ठरविले. इस्लामची अपेक्षा आहे की जो काही माल आपणाजवळ आहे एक तर त्याला आपल्या गरजेच्या वस्तू खरेदी करण्यावर खर्च करा अथवा दुसऱ्यांना द्या. ते आपल्या गरजेच्या वस्तू विकत घेतील आणि याप्रकारे पूर्ण संपत्ती समाजात फिरत राहील.

परंतु तुम्ही जर असे करत नाही आणि जमा करण्याचीच जिद्द करता तर आपल्या त्या जमा केलेल्या संपत्तीतून कायद्याप्रमाणे अडीच टक्के रक्कम प्रतिवर्ष काढून घेतली जाईल आणि तिला त्या लोकांच्या सहाय्यतेत खर्च केले जाईल जे आर्थिक संघर्षात भाग घेण्याच्या योग्य नाहीत किंवा संघर्ष अथवा प्रयासाव्यतिरिक्त जे आपला पूर्ण वाटा मिळण्यापासून वंचित आहेत- याचे नाव जकात आहे. याच्या प्रबंधाची पध्दत इस्लामने प्रस्तुत केली आहे. जकातला समाजाच्या संयुक्त कोषात जमा केले जाते. कोषागार त्या सर्व लोकांच्या गरजांचा जबाबदार बनून जातो ज्यांना मदतीची गरज आहे. ही समाजासाठी विम्याची अतिशय चांगली पध्दत आहे. यामुळे त्या सर्व बिघाडांचे उच्चाटन होऊन जाते जे सामूहिक मदत आणि सहयोगाला समुचित प्रबंध नसल्याने निर्माण होत असतात. भांडवलदारी व्यवस्थेत जी वस्तू लोकांना संपत्ती जमा करण्यावर आणि तिला लाभदायक कामांमध्ये लावण्यावर विवश करीत असते आणि जिच्या कारणास्तव जीवन विमा आदींची गरज असते, ती ही आहे की

प्रत्येक व्यक्ती जीवनव्यवस्थेत आपल्या साधनांवरच निर्भर असते. ती वृध्द झाली आणि काहीही शिल्लक ठेवले नसेल तर उपाशी मरेल. मुलाबाळांसाठी काही सोडल्याविनाच जर कोणी व्यक्ती मेली तर ते दारोदार भटकतील आणि भिकेचा तुकडा मिळवू शकणार नाहीत. आजारी पडल्यावर शिल्लक नसेल तर उपायसुद्धा करू शकणार नाही. घर जळाले अथवा व्यवसायात तोटा झाला किंवा कोणती आणखी आपदा आली तर कुठूनही त्याला सहायत्ता मिळण्याची आशा नाही. याचप्रकारे भांडवलदारी व्यवस्थेमध्ये जी वस्तू श्रमिकवर्गाच्या लोकांना भांडवलशाहीचा गुलाम बनण्यावर आणि त्यांच्या अटींवर काम करण्यासाठी विवश करून टाकत असते तीसुद्धा हीच आहे. जो काही कष्टाचा मोबदला भांडवलदार देतो, त्याला गरीब माणूस जर घेणार नाही तर उपाशी राहील आणि विवस्त्र भटकेल. भांडवलशाहीच्या इनामापासून तोंड फिरवून त्याला दोन वेळेची भाकरी मिळणे कठीण आहे. मग हा मोठा तिरस्कार जो आज भांडवलदारी व्यवस्थेने जग विळख्यात आहे की एकीकडे लाखो करोडो माणसे वंचितावस्थेत आहेत आणि दुसरीकडे जमिनीची उपज आणि कारखान्यांत बनलेल्या सामानांचे ढीगच्या ढीग लागलेले आहेत. परंतु त्याला विकत घेतले जाऊ शकत नाही. लाखो मन गहू समुद्रात फेकला जातो आणि भुकेल्या मानवांच्या पोटापर्यंत पोहचत नाही. याचे कारण हेच आहे की वंचित लोकांपर्यंत जीवनसामग्री पोहचविण्याचा कोणताही प्रबंध नाही. या सर्वांमध्ये क्रयशक्ती निर्माण केली जावी आणि ते आपली गरज आणि इच्छेनुसार वस्तू विकत घेण्यायोग्य होऊन जावेत. सारांश हा की व्यापर, उद्योग आणि कृषी अशा प्रत्येक उद्योगाची प्रगती व्हावी. इस्लाम 'जकात' आणि 'बैतुलमाल' (सरकारी खजिना) द्वारे या सर्व बिघाडांना दूर करतो. बैतुलमाल प्रत्येक वेळी आपल्या मागे सहाय्यकाच्या भूमिकेने हजर आहे. आपणास उद्याची काळजी करण्याची गरज नाही. आपणास गरज असेल तेव्हा 'बैतुलमाल' मधून आपला हक्क घेऊन यावा. मग बँक डिपॉझिट आणि जीवन विमा पॉलीसीची काय गरज? आपण आपल्या मुलाबाळांना सोडून समाधानाने जगाचा निरोप घेऊ शकता. आपल्या मागे सरकारी खजिना त्यांचा जबाबदार आहे. आजारपण, वृद्धत्व आणि प्राकृतिक संकटे, मग ती आसमानी असोत वा जमिनी प्रत्येक परिस्थितीत बैतुलमाल आपला स्थाई सहाय्यक आहे. भांडवलशाही आपल्या अटींवर काम करण्यासाठी आपणास विवश करू शकत नाही. बैतुलमाल अस्तित्वात असताना आपणासाठी भूक, निवारा आणि निर्धनतेचे कोणतेही भय नाही. मग हा बैतुलमाल धन कमविण्यात पूर्णत: असमर्थ अथवा कमी निर्मिती करण्याऱ्या लोकांना गरजेचे सामान विकत घेण्यास सक्षम बनवून टाकतो. या प्रकारे मालाचे उत्पादन आणि त्याची खपत यामध्ये निरंतर संतुलन बनून राहते. याची आवश्कता उरत नाही की आपण आपल्या दिवाळखोरपणाला जगभरातील लोकांच्या डोक्यावर थोपवावे आणि शेवटी दुसऱ्या ग्रहांपर्यंत पोहचण्याची गरज पडावी. जकातव्यतिरिक्त दुसरा उपाय जो एका ठिकाणी साठलेल्या संपत्तीला फैलावण्यासाठी इस्लामने अवलंबिला आहे, तो वारसाहक्काचा कायदा आहे. इस्लामशिवाय अन्य कायद्यांचा झुकाव याकडे आहे की जी संपत्ती एका व्यक्तीने

साठविली आहे, ती त्याच्या मृत्यूनंतरही साठवलेली राहावी. इस्लाम या विपरीत ही पध्दत अवलंबवितो की ज्या संपत्तीला एक व्यक्ती साठवून-साठवून एक ठिकाणी कैद करत राहिला होता, तो मरताच ती वाटून दिली जावी. इस्लामी कायद्यात मुले-मुली, आई-वडील, भाऊ-बहीण आणि पत्नी सर्व एका व्यक्तीचे वारस आहेत आणि एका नियमानुसार सर्वांमध्ये पैतृक संपत्ती वाटणे जरुरीचे आहे. जवळचे नातेवाईक अस्तित्वात नसतील तर लांबचे नातेवाईक शोधले जातील आणि त्यांच्यामध्ये ही संपत्ती वाटण्यात जाईल. कोणी नातेवाईकच नसतील, तेव्हासुद्धा व्यक्तीला कोणास आपल्या जीभेने म्हटलेला मुलगा मानण्याचा हक्क नाही. या स्थितीत पूर्ण समाज त्याचा वारस आहे. त्याची साठवलेली सर्व संपत्ती बैतुलमालमध्ये जमा केली जाईल. याप्रकारे मग कोणी व्यक्ती करोडो अथवा अब्जावधीची संपत्ती जमा करो, त्याच्या मृत्यूनंतर दोन-तीन पिढ्यांमध्ये ती सर्व लहान-लहान तुकड्यांमध्ये वाटून दिली जाईल आणि संपत्तीचा प्रत्येक साठा क्रमश: वितरीत होत राहील.

ही अर्थव्यवस्था, जिचा मी अत्यंत संक्षिप्त तक्ता प्रस्तुत केला आहे त्यावर विचार करा. ही खाजगी मिळकतीच्या त्या सर्व नुकसानीला दूर करू नाही जे सैतानाच्या चुकीच्या मार्गदर्शनामुळे निर्माण होत असते काय? मग शेवटी याची काय आवश्यकता आहे की आम्ही साम्यवादी दृष्टिकोन वा फॅसिस्टवाद आणि राष्ट्रीय समाजवादाच्या दृष्टिकोनाचा स्वीकार करावा. आर्थिक व्यवस्थेच्या कृत्रिम पध्दतींचा वापर करावा. ते तर एक बिघाड दूर करत नाहीत. तो त्या जागी दुसरे बिघाड निर्माण करुन टाकतात! इथे मी इस्लामच्या संपूर्ण आर्थिक व्यवस्थेचा उल्लेख केलेला नाही. पृथ्वीचा प्रबंध औद्योगिक विवादांचे जे निपटारे तथा उद्योग-धंद्यासाठी धन गोळा करण्याच्या ज्या पध्दती इस्लामच्या सिध्दान्तानुसार अवलंबविल्या जाऊ शकतात आणि ज्यांच्यासाठी इस्लामी कायद्यात पूर्ण संभावना सुद्धा ठेवली गेलेली आहे, त्यांना या संक्षिप्त लेखात प्रस्तुत करणे कठीण आहे. मग इस्लामने ज्याप्रकारे आयात-निर्यातीचे कर आणि देशामध्ये व्यापारी माल आणण्यावर आणि घेऊन जाण्याच्या प्रतिबंधांना हटवून गरजेच्या सामानांचा स्वतंत्र विनिमयाचा मार्ग अवलंबिला आहे, त्याचा मी उल्लेख करु शकलो नाही. या सर्वांपेक्षा मला हे सांगण्याची संधीसुध्दा मिळाली नाही की प्रशासनिक व्यवस्था, सिव्हिल सेवा आणि सेनेच्या खर्चांना संभावित सीमांपर्यंत घटवून आणि न्यायालयाच्या स्टॅम्प ड्युटीला पूर्णपणे हटवून इस्लामने समाजावरून त्या आर्थिक ओझ्याला हलके केले आहे. करांना आर्थिक प्रशासनाच्या सीमेहून वाढलेल्या खर्चामध्ये खपवून टाकण्याऐवजी समाजाच्या सुख-सुविधा आणि फायद्यासाठी खर्च करण्याची संधी प्रदान केलेली आहे. यामुळे इस्लामची अर्थव्यवस्था मानवांसाठी किती मोठी कृपा बनून जाते. पक्षपात सोडून दिला जावा आणि वाडवडिलांपासून जी अज्ञानतापूर्ण संकीर्णता वारसाहक्कात मिळालेली आहे, तसेच ग़ैरइस्लामी शासनयंत्रणेने आपले प्रभुत्व जमविल्याने जो प्रभाव बुध्दीवर पडला आहे,

त्याला दूर करून स्वतंत्र अन्वेक्षणात्मक दृष्टीने या व्यवस्थेचे अध्ययन केले जावे. मला आशा आहे की एकही न्यायप्रिय व्यक्ती असा भेटणार नाही की जो मानवाच्या आर्थिक हितासाठी या व्यवस्थेला सर्वांत अधिक उपयोगी, योग्य आणि बुध्दीसंगत स्वीकार करणार नाही. परंतु जर कोणाला हा गैरसमज असेल की इस्लामच्या संपूर्ण धोरणात्मक, नैतिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेतून फक्त तिच्या आर्थिक प्रणालीस घेऊन सफलेने चालविले जाऊ शकते तर मी त्याला निवेदन करीन की कृपया या गैरसमजाला मनातून काढून टाकावे. या आर्थिक व्यवस्थेचा घनिष्ठ संबंध इस्लामच्या राजनैतिक, न्यायिक, कायदेविषयक, सांस्कृतिक आणि सामाजिक व्यवस्थेशी आहे. मग या सर्व गोष्टींचा पाया इस्लामच्या नैतिक व्यवस्थेवर कायम आहे आणि ती नैतिक व्यवस्थाही स्वत:वर कायम नाही तर ती पूर्ण रूपाने या गोष्टीवर टिकून आहे की आपण एका सर्वशक्तिशाली आणि सर्वज्ञ अल्लाहवर श्रध्दा (इमान) ठेवावी आणि स्वत:ला त्याच्यासमोर उत्तरदायी समजावे. मृत्यूनंतर पारलौकिक जीवनाला मानावे आणि हेसुध्दा स्वीकार करावे की परलोकात अल्लाहच्या न्यायालयासमोर जीवनाच्या सर्व कर्मांना परखले जाईल आणि तपासणीनुसार बक्षीस अथवा शिक्षा मिळेल. हेही मानावे लागेल की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जे नैतिक नियम आणि अन्य कायदे आपणापर्यंत पोहचविले आहेत, ज्याचा एक भाग आर्थिक व्यवस्थासुध्दा आहे, ती पूर्णत: अल्लाहच्या आदेशावर आधारित आहे, यावर दृढ विश्वास ठेवा. जर या धारणा, नैतिक व्यवस्था आणि संपूर्ण जीवनप्रणालीस आपण जसेच्या तसे स्वीकारले नाही तर केवळ इस्लामी अर्थव्यवस्था एक दिवसही आपल्या योग्य आत्म्याने चालू शकणार नाही आणि न तुम्ही तिच्यापासून कोणतेही उल्लेखनीय लाभ उठवू शकाल.

-----